मा. जिल्हा न्यायाधीश साहेब, बीड यांचे न्यायालयात.

क्रि. दि. अर्ज क्र. 3940/25

Exh. 6

अनुराग

वि

शासन

Order
-----
Production Allowed

RENUKA MANIKRAO SATAV — Digitally signed by RENUKA MANIKRAO SATAV Date: 2026.02.07 17:26:50 +0530

Adhoc DJ-3, Beed

महोदय,

अर्जदार तर्फे विनंती अर्ज, खालील प्रमाणे,

1. असे की, प्रस्तुत प्रकरण आज रोजी बोर्डवर आले.
2. असे की, प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार तर्फे आज रोजी महत्वाची कागदपत्र दाखल करण्यासाठी मा. न्यायालयाने परवानगी देण्याची कृपा करावी.

तरि विनंती की,

प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार तर्फे कागदपत्र दाखल करण्यासाठी मा. न्यायालयाने परवानगी देण्याची कृपा करावी.

ता. बीड.
7/2/2026

अर्जदार तर्फे
(signature) Adv.
ॲड. एम. डी. घोडे
बीड.

मा. जिल्हा न्यायाधीश साहेब, बीड यांचे न्यायालयात.

कि. दि. अर्ज क्र. 394/25

Exh. 7

अनुराग

वि

शासन.

Order
------
Filed
RENUKA MANIKRAO SATAV
Digitally signed by RENUKA MANIKRAO SATAV
Date: 2026.02.07 17:27:00 +0530
Adhoc DJ-3, Beed

## कागदपत्राची यादी.

| अ.क्र. | कागदपत्राचे नाव | दिनांक | शेरा. |
|---|---|---|---|
| ① | दै. मराठवाडा प्रजा जाहिर प्रगटन. | 15 नोव्हेंबर 2025 | झेरॉक्स. |

ता. बीड.

7/2/2026

अर्जदार तर्फे
[signature]
ॲड. एम. डी. घोडे.
बीड.

# जाहीर प्रगटन

## मा.श्रीमती आर. एम. सातव, तदर्थ जिल्हा न्यायाधीश – ३, बीड यांचे न्यायालयात

Exh. 8

**किरकोळ दिवाणी अर्ज क. : ३१४/२०२५**

अर्जदार– अनुराग राजेश देशापांडे, वय ०६ वर्षे, मार्फत अ.पा.क. राजेश रमेश देशपांडे, रा. चकलांबा, ता. गेवराई, जि. बीड, ह.मु. मोहर प्रतीमा, राव कॉलनी, तळेगाव दाभाडे, पुणे

:: विरूध्द ::

गैरअर्जदार :– महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय, ता. जि. बीड

मागणी– अज्ञानाचे नावे असलेली मालमत्ता हस्तांतरण/ विक्री करण्याची परवानगी मिळणेबाबत.

ज्याअर्थी अर्जदार परवेज अनुराग राजेश देशापांडे, वय ०६ वर्षे, मार्फत अ.पा.क. राजेश रमेश देशपांडे, रा. चकलांबा, ता. गेवराई, जि. बीड ह.मु. मोहर प्रतीमा, राव कॉलनी, तळेगाव दाभाडे, पुणे यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अर्जदार यांचा मुलगा नामे चि. अनुराग राजेश देशपांडे, वय: ०६ वर्ष मौजे चकलांबा ता. गेवराई, जि. बीड येथील गट क्र १०७३ मधील १हे ३० आर क्षेत्र पैकी पूर्ण पाहा रु.३–२० पैसे जमीन मिळकत ही अज्ञानाची आई श्वेता राजेश देशपांडे हिचे नावावर होती. श्वेता देशपांडे ही मयत झाल्यानंतर तिचे पश्चात अज्ञान अनुराग राजेश पांडे अ.पा.क. वडील राजेश रमेश देशपांडे याचे नावाची नोंद झालेली आहे. सदर संपुर्ण जमीन १हे. ३० आर क्षेत्र पुर्ण पाहा जमीन विक्री करणे आहे. सदर विक्री क्षेत्र १३० आर ची चतुरसिमा अगोदर पुर्वेस ओढा, पश्चिमेस ओढा, दक्षिणेस सुधाकर मधुकर यांची जमीन व उत्तरेस कचरु सागळे यांची जमीन असे आहे जे अज्ञानाचे नावे असलेली क्षेत्रासह सदर मिळकत विक्री करण्याची व अज्ञानाचे पालनकर्ता म्हणुन नेमण्याची परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वत: किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

आज दिनांक १५/११ / २०२५ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. प्रकरणातील पुढील तारीख : १५/१२/२०२५

आदेशावरून

(अर्जदारातर्फे वकिल : ॲड. एम. डी. धांडे)

(स्वाक्षरीत)

(स्वाक्षरीत)

शिक्का

अधिक्षक

क.लिपीक

दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

Exh. 9

# मा.जिल्हा न्यायाधीश साहेब, बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. 20~~30~~/२०२५
394/

**अर्जदार** : अनुराग राजेश देशपांडे,

विरूध्द

**गैरअर्जदार** : महाराष्ट्र शासन,
मार्फत जिल्हाधिकारी, बीड

**अर्ज** : कलम ८(२) हिंदू मायनॉरिटी ॲन्ड गार्डीयनशिप ॲक्ट सह कलम २९ व ३० गार्डीयन ॲन्ड वार्डस् ॲक्ट अन्वये अज्ञानाचे नावे असलेली मालमत्ता हस्तांतरण /विक्री करण्याची परवानगी मिळणे बाबत.

Order
------
Read and Recorded

RENUKA MANIKRAO SATAV
Digitally signed by RENUKA MANIKRAO SATAV
Date: 2026.02.07 17:27:11 +0530

Adhoc DJ-3, Beed

## पुराव्याचे शपथपत्र
## (अर्जदारा तर्फे साक्षीदार क्र.१)

मी, निवेदक नामे राजेश रमेश देशपांडे, वय-३६ वर्षे, धंदा-शेती, रा.चकलांबा, ता.गेवराई, जि.बीड,ह.मु.मोहर प्रतिमा,राव कॉलनी,तळेगांव दाभाडे,पुणे शपथेवर सत्य निवेदन करतो की,

१. प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार अनुराग राजेश देशपांडे हा माझा अज्ञान मुलगा असून, त्याचे वतीने मी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार अनुराग राजेश देशपांडे हा अज्ञान असून, सध्या इयत्ता पहिलीच्या वर्गा मध्ये तळेगांव दाभाडे, पुणे येथे शिक्षण घेत आहे. मी अर्जदार राजेश रमेश देशपांडे हे अज्ञानाचे अ.पा.क.वडील आहेत. अर्जदाराची आई नामे श्वेता भ्र.राजेश देशपांडे ही दिनांक १९-१०-२०२३ रोजी मयत झालेली आहे.

२. मौजे चकलांबा, ता.गेवराई, जि.बीड येथे गट क्र.१०७३ मध्ये १ हे.३० आर आकार रु.३-२० पैसे जमीन मिळकत ही अज्ञानाची आई श्वेता भ्र.राजेश देशपांडे हिचे नावावर होती. श्वेता भ्र.राजेश देशपांडे ही मयत झाल्या नंतर तिचे पश्चात् अज्ञान अनुराग राजेश देशपांडे अ.पा.क.वडील राजेश रमेश देशपांडे याचे नावाची नोंद फेरफार क्र.६२५८ अन्वये ७/१२ उताऱ्यास नोंद झालेली आहे. अर्जदार

Superintendent
District and Session Court
Beed

हा सदरील मिळकतीची देखभाल करतो. सदर संपुर्ण जमीन १ हे.३० आर पूर्ण जमीन विक्री करणे आहे.

सदर विक्री क्षेत्र १ हे.३० आर ची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | ओढा |
| पश्चिमेस | : | ओढा |
| दक्षिणेस | : | सुधाकर मधुकर यांची जमीन |
| उत्तरेस | : | कचरू सांगळे यांची जमीन |

उपरोक्त जमीन १ हे.३० आर ही अज्ञानाचे नावे असून, सदर जमीन विक्री करण्यासाठी मा.न्यायालयाचे परवानगीची आवश्यकता आहे.

२. आवश्यक ती माहिती खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | अज्ञानाचे नाव, लिंग, धर्म, जन्म तारीख व राहण्याचा पत्ता | : | अनुराग राजेश देशपांडे, वय-६ वर्ष मुलगा, हिन्दू जन्म दि.१९-०५-२०१९ |
| ब) | अज्ञान ही स्त्री आहे का ? ती विवाहीत आहे का, जर असेल तर तिचे पतीचे नांव | : | लागू नाही. |
| क) | अज्ञानाचे नांवे असलेली स्थावर, तिचे ठिकाण व अंदाजित किंमत | : | परिच्छेद नं.१ मध्ये नमूद केलेली मौजे चकलांबा, ता.गेवराई जि.बीड येथील गट नं.१०७३ मधील १ हे.३० आर जमीन ज्याची बाजारी किंमत रू.१५,००,०००/- |
| ड) | अज्ञान व त्याचे मिळकतीची देखभाल करणाऱ्या व्यक्तीचे नांव व पत्ता | : | अर्जदार , शिर्षक परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे |

Superintendent
District and Session Court
Beed

इ) अज्ञान व त्याचे मालमत्तेचे रक्षण करणारे अज्ञानाचे वतीने कोणी नेमले आहेत काय ? : नाही.

ई) अज्ञानाचे अथवा अज्ञानाचे मालमत्तेचे पालक नेमण्या बाबत यापुर्वी मा.न्यायालयात अथवा इतर न्यायालयात अर्ज केला आहे काय ? केला असल्यास, त्या बाबतचा निर्णय/आदेश. : नाही

उ) अज्ञान व त्याचे मालमत्तेचे पालक म्हणून नेमणूक होणे /त्याचे पालक म्हणून जाहीर करणे किंवा दोन्हीही. : होय, दोन्हीही.

ऊ) अर्ज अज्ञानाचे पालक म्हणून नेमण्याचा असेल तर पालका बाबत क्वालिफीकेशन : अर्जदार हे अज्ञानाचे वडील आहेत.

ए) अर्जदाराचा हा अर्ज अज्ञानाचे पालक म्हणून जाहीर करण्याचा असेल तर कोणत्या मुद्यावर : नमुद केल्या प्रमाणे.

ऐ) अर्ज देण्याचे कारण काय घडले ? : अज्ञान मुलाच्या दर्जेदार शिक्षण व त्याचे हितासाठी.

ओ) अर्जदारास इतर काही प्रकरणांच्या सविस्तर माहिती देणे असल्यास नमूद करावी. : खालील प्रमाणे.

7/4/26

Superintendent
District and Session Court
Beed

३. माझा अज्ञान मुलगा अनुराग राजेश देशपांडे हा इयत्ता पहिलीच्या वर्गात शिक्षण घेत असून, अज्ञान मुलाचे नावे परिच्छेद क्र.१ मधील जमीन असून, सदर जमीन ही कोरडवाहू असून, सुपीक नाही. सदर जमीन विक्री करुन येणाऱ्या पैशांतून मी माझ्या अज्ञान मुलाचे चांगल्या प्रकारे शिक्षण व उज्वल भविष्या करिता वापर करणार आहे.

४. मी अज्ञान मुलाच्या हितासाठी व त्याचे उज्वल भविष्य सुधारण्यासाठी अज्ञान मुलाच्या नावे असलेली मौजे चकलांबा, ता.गेवराई, जि.बीड येथील गट नं.१०७३ मधील १ हे.३० आर जमीन लिहून घेणार विशाल शशिकांत कुलकर्णी, रा.चकलांबा, ता.गेवराई, जि.बीड, यांना रक्कम रु.१५,००,०००/-(पंधरा लाख रु.) मध्ये कायमस्वरुपी विक्री करण्याचा ठराव केला असून, मी दि.२८-१०-२०२५ रोजी नोटरी दस्त क्र.८५/२०२५ अन्वये लिहून घेणार यांचे हक्कात इसारपावती करुन दिलेली आहे. लिहून घेणार यांचेकडून रक्कम रु.५,००,०००/- इसारापोटी स्वीकारले आहेत व उर्वरीत रक्कम मा.न्यायालयाचे परवानगी नंतर खरेदीखतावर घेण्याचे ठरले आहे.

५. मी सदर जमीन विक्री करून आलेली रक्कम ही केवळ अज्ञान मुलाचे उज्वल भविष्यासाठी वापरणार आहे. सदर जमीन ही आजच्या बाजार भावाप्रमाणे विक्री करण्यात येत आहे.

६. मा.न्यायालयाचे आदेशा नुसार दैनिक मराठवाडापत्र, बीड या वर्तमानपत्रा मध्ये दि.१५-११-२०२५ रोजी जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेले असून मुदती मध्ये आजपर्यंत कोणाचाही कसलाही आक्षेप आलेला नाही.

७. प्रस्तुत प्रकरणात सोबत मी माझे शपथपत्र, ७/१२, मुलाचे बोनाफाईड सर्टिफिकेट, इसारपावती,अज्ञानाचे आईचे मृत्यू प्रमाणपत्र, आधार कार्ड इत्यादी

7/1/26
Superintendent
District and Session Court
Beed

दाखल केले असून, त्यांना निशाणी क्रमांक देण्यात येऊन ते पुराव्याकामी वाचण्यात यावेत. तरी, न्यायाचे व हिताचे दृष्टीने अज्ञान मुलगा चि.अनुराग राजेश देशपांडे याचे नावे असलेली मौजे चकलांबा, ता.गेवराई जि.बीड येथील गट नं.१०७३ मधील १ हे.३० आर जमीन अर्जाचे परिच्छेद नं.१ मध्ये नमूद केलेली विक्री करण्याची परवानगी देण्यात यावी व माझा अर्ज त्यातील विनंती प्रमाणे पुर्णतः मंजुर करण्यात यावा.

सबब हे पुराव्याचे शपथपत्र.

निवेदक

बीड

दिनांक : ०७/०२/२०२५

राजेश रमेश देशपांडे

मी, निवेदक सत्यप्रतिज्ञेवर निवेदन करतो की, वरील शपथपत्रातील संपूर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे.

निवेदक

बीड

दिनांक : ०७/०२/२०२५

राजेश रमेश देशपांडे

मी निवेदकास ओळखतो.

Adv.

ॲड.एम.डी.धांडे, बीड

शपथवर खरे सांगतो की, माझे नांव राजेश रमेश देशपांडे, वय - ३६ वर्षे,
माझे समक्ष ॲड.श्री एम.डी.धांडे धंदा शेती, रा.चकलांबा ता. गेवराई जि.बीड ह.मु.
यांनी ओळख दिली त्यांना मी वैयक्तिक ओळखतो. मोरे प्रतिमा, राव कॉलनी तळेगांव दाभाडे ता.मावळ जि.पुणे
दि. 07/02/2025.

अधिक्षक
जिल्हा व सत्र न्यायालय, बीड

मा. जिल्हा न्यायाधीश साहेब, बीड येथे न्यायालयात.

क्रि. दि. अर्ज क्र. 394/25

Exh. 10

अनुराग

वि

शासन

Order
-------
Seen and Filed

RENUKA MANIKRAO SATAV
Digitally signed by RENUKA MANIKRAO SATAV
Date: 2026.02.07 17:27:25 +0530

Adhoc DJ-3, Beed

# पुरसिस.

प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार तर्फे लेखी अथवा तोंडी पुरावा देणे नाही. या करिता हि सबब पुरसिस.

अर्जदार तर्फे
(सही)
Adv.
डॉ. एम. डी. थोरात
बीड.

ता. बीड.
7/2/2026